अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
शिवाजीनगर, पुणे - ५

दिनांक :- १५.१०.२०१५

# भारत सरकार शिष्यवृत्ती/फिशीपच्या विषयी सूचना

## अनुसूचित जमातीच्या (ST)विद्यार्थ्यांसाठी

सर्व अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांसाठी या वर्षीपासून ऑनलाईन (online) पध्दतीने https://etribal.maharashtra.gov.in/evikas/main/common/aboutevikas.aspx या साईटवर शिष्यवृत्ती / फिशिपचा अर्ज भरायचे आहेत व भरलेल्या अर्जाची एक प्रत दिनांक ३०/१०/२०१५ पर्यंत दुपारी २:३० ते ५:३० या वेळेतच लेखाविभागामध्ये सादर करावयाची आहे. मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत व कोणतेही कारण विचारात घेतले जाणार नाही.

शिष्यवृत्ती / फिशिपच्या अर्जा बरोबर जोडवयाची कागदपत्रे :-

१. मागील वर्षाची गुणपत्रीका
२. जातीचे प्रमाणपत्र
३. उत्पन्नाचा दाखला
४. जात पडताळणी प्रमाणपत्र
५. आधार कार्ड
६. शैक्षणिक वर्षात खंड असेल तर तहसिलदारासमोरील प्रतिज्ञा प्रमाणपत्र
७. College Allotment Letter
८. Student Undertaking /Acknowledment form

१ वरील प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती /फिशिपचा अर्ज भरत असताना एकाच शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा. दोन शिष्यवृत्ती /फिशिपचा लाभ विद्यार्थ्यांनी घेवू नये.

२ शिष्यवृत्ती व फीशिपचा अर्ज परिपूर्ण व बिनचुक भरल्यानंतर त्याची एक प्रत लेखा विभागात सादर करावी.

३ फक्त शिष्यवृत्ती घेणा-या विद्यार्थ्यांस वसतीगृह निर्वाह भत्ता मिळेल. फ्रिशिप घेणा-या विद्यार्थ्यांस वसतीगृह निर्वाह भत्ता मिळणार नाही.

४ विद्यार्थ्यांकडून कॉलेजच्या शुल्कापोटी समाजकल्याण विभागाकडून प्राप्त न होणारी रक्कमच फक्त घेण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिपची रक्कम मिळणार नाही. तसेच समाजकल्याण विभागाकडून उर्वरित रक्कम मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती / फ्रिशिपचे अर्ज भरणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थीनी वरील मागास प्रवर्गातील फि भरलेली आहे व जे विद्यार्थी शिष्यवृत्ती / फ्रिशिपचे अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शुल्क भरावे.

५ शिष्यवृत्तीचा अर्ज भरणा-या विद्यार्थास वसतीगृह निर्वाह भत्ता हा समाजकल्याण विभागाकडून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. त्यामुळे त्याची चौकशी लेखा विभागात वारंवार करु नये.

६ ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केला आहे अशा विद्यार्थ्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये बँके खाते उघडावणे अनिवार्य आहे.

७ वरील शिष्यवृत्तीचा अर्ज लेखा विभागात सादर केल्यानंतर त्याची पोच पावती (Student Undertaking / Acknowledgement Receipt) लेखा विभागातून घ्यावी तसेच पोच पावती शिष्यवृत्ती मिळेपर्यंत जपून ठेवावी. पोच पावतीशिवाय कोणतीही तकार ऐकूण घेतली जाणार नाही. पोच पावती हरविल्यास आपण शिष्यवृत्तीचा अर्ज भरला नाही असे समजण्यात येईल.

८ शिष्यवृत्ती अर्जाची छानणी करताना अर्जामध्ये / कागदपत्रामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याची यादी कॉलेजच्या वेब साईटवर Notices —> Scholarship Notices —> Scholarships for 2015-16 या टॅबच्या खाली लावण्यात येईल तसेच संबधित विद्यार्थ्यांनी त्याप्रमाणे असलेल्या त्रुटींचे निवारण करावे व जर आपण त्यांचे वेळेत निवारण केले नाही तर अशा विद्यार्थ्यांची नावे पुढील कार्यवाहीसाठी Dean Academics / Dean Students यांचेकडे पाठविली जाईल. काही विद्यार्थी गर्दीचा फायदा घेवून शिष्यवृत्ती/फ्रिशीपचे अर्धवट भरलेले अर्ज व चुकीचे अंडरटेकिंग भरुन लेखाविभागात सादर करतात असे अर्ज लेखाविभागाच्या छानणीमध्ये लक्षात येतात. जे विद्यार्थी असे अर्धवट/अपूर्ण/चुकीचे अर्ज सादर करतील त्यांची नावे मा. संचालक/उपसंचालक यांना शिस्तभंगाच्या

कार्यवाहीसाठी पाठवली जाईल. तसेच लेखाविभागाकडूनही जर नजरचुकीने अशा अर्जाची छाननी केली गेली तर त्या विद्यार्थ्याने वेळीच झालेली चुक लक्षात आणून दयावी.

९ सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती / फ्रिशिप विषयीच्या सर्व सूचना नोटीस बोर्डवर व कॉलेजच्या वेबसाईट,कॉलेजच्या वेबसाईटवरील मेल वेळच्या वेळी पाहाणे आवश्यक आहे. तसेच काही शंका असल्यास संबधित विभागाशी त्वरीत संपर्क साधून शंकेचे निरसन करुन घ्यावे. आम्हाला माहित नव्हते ही सबब चालणार नाही.

१० विद्यार्थांनी वरील मुदतीमध्येच शिष्यवृत्ती /फ्रिशीपचे अर्ज लेखाविभागामध्ये दुपारी २:३० ते सांय.५:३० यावेळेमध्येच जमा करावेत. वर दिलेल्या मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत व कोणतेही कारण विचारात घेतले जाणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची असेल.

स्थानापन्न संचालक,
अभियांत्रिकी महाविद्यालय,
पुणे.